## नियमीत दिवाणी मुकदमा नं.३०७/२०२२ मधील

## निशाणी–१९ व २१ वरील एकत्रित आदेश

सदरचे अर्ज प्रतिवादी क्र.१ व २ यांच्याविरुध्द ध्वनीत (Implied) स्वरुपाचा ''विना कैफीयत'' चा झालेला आदेश रद्द होऊन त्यांना ''मुळ दाव्यास कैफीयत व जबाब'' दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन कैफीयत व जबाब दाखल करुन घेणेसाठी दाखल केलेले आहेत.

२. प्रतिवादी क्र.१ व २ यांचे कथन की, ते दि.१५/१०/२०२२ रोजी न्यायालयात हजर झालेले आहेत. त्यानंतर त्यांना कायदेशीर मुदतीमध्ये कैफीयत व जबाब दाखल करणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक होते, परंतु त्यांना आवश्यक ती माहिती व कागदपत्रे मुदतीमध्ये उपलब्ध न झाल्याने व ते बाहेरगावी राहण्यास असल्याने त्यांना वकीलांची भेट घेऊन माहिती देता आली नाही त्यामुळे त्यांच्याविरुध्द ध्वनीत (Implied) स्वरुपाचा ''विना कैफीयत'' चा आदेश कायद्यातील तरतुदीनुसार झाला आहे. तरी प्रतिवादी यांना कैफीयत व जबाब दाखल करण्यास विलंब झालेला माफ न केल्यास व त्यांची कैफीयत व जबाब दाखल करुन न घेतल्यास त्यांचे कधीही न भरुन येणारे अपरिमीत असे नुकसान होणार आहे. याउलट विलंब माफ केल्यास वादी यांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही. प्रतिवादींनी त्यांच्या कथनाच्या पृष्ठ्यर्थ निशाणी–२० व २२ वर प्रतिज्ञापत्रे दाखल केलेली आहेत.

३. वादी विधीज्ञांनी सदर अर्जांवर त्यांचे म्हणणे दाखल करुन आक्षेप नोंदवला असुन त्यांचे पुढे असे म्हणणे आहे की, सदरचे अर्ज मंजुर करण्याचे झाल्यास जास्तीत जास्त दंड आकारुन मंजूर करावे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.१ व २ हे दि.१५/१०/२०२२ रोजी न्यायालयात हजर झालेले आहेत. त्यानंतर त्यांनी मुदतीत कैफीयत व जबाब दाखल केलेला नाही, त्यामुळे त्यांच्याविरुध्द ध्वनीत (Implied) स्वरुपाचा ''विना कैफीयत'' चा आदेश कायद्यातील तरतुदीनुसार झाला आहे. सदर प्रतिवादी यांनी दि.२०/०२/२०२३ रोजी सदर अर्ज दिलेले आहेत. प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या अर्जातील नमुद कारणे संयुक्तीक आहेत, त्यामुळे दाव्याचे स्वरुप पाहता व सदरील दावा गुणदोषावर निर्णयीत करण्यासाठी प्रतिवादी क्र.१ व २ त्यांच्याविरुध्द ध्वनीत (Implied) स्वरुपाचा ''विना कैफीयत'' चा आदेश कायद्यातील तरतुदीनुसार झालेला आदेश रद्द करणे व कैफीयत व जबाब दाखल करण्यास झालेला विलंब माफ करणे योग्य व क्रमप्राप्त आहे. परंतु प्रतिवादी क्र.१ व २ यांनी केलेल्या विलंबामुळे वादी यांचे झालेले नुकसान देखील नजरअंदाज करुन चालणार नाही म्हणुन प्रतिवादी क्र.१ व २ यांचे अर्ज दंड लावून मंजूर करणे योग्य राहील. कारणे आदेश :–

## <u>आदेश</u>

१. अर्ज रक्कम **रु.१००/–** च्या खर्चासह मंजुर करणेत येत आहेत.

२. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी खर्चाची रक्कम वादी यांना दिल्यानंतर त्यांची कैफीयत व जबाब अभिलेखावर घेण्यात येईल.

Sd/-XXX

दिनांक : ०६/०४/२०२३.

**(श्री. एम. एस. भरड)**

२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सासवड.